# जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
# निविदा सूचना सन २०११-१२

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांचे आस्थापनेवरील गट-क व गट - ड संवर्गातील भरतीप्रक्रियेसाठी खाली नमूद केलेल्या कामासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेचा फॉर्म आणि अटी व शर्तीचा नमुना रक्कम रु. १००/- रोख भरुन जिल्हाधिकारी कार्यालय, (आस्थापना शाखा), रत्नागिरी - ४१५ ६१२ येथून प्राप्त करुन घ्यावा.

यथोचितरित्या भरलेली आणि सर्व दृष्टीने परिपूर्ण निविदा **दिनांक १५/०९/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** स्विकारणेत येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता कंत्राटदारांसमोर अथवा त्यांच्या प्रतिनिर्धीसमोर उघडण्यात येतील. कंत्राटदारांना त्यांची निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत आवश्यक ते करारपत्र करुन द्यावे लागेल.

सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही. करारनामा लिहून दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत काम बिनचूक पूर्ण करुन द्यावे लागेल. कोणतेही साहित्य किंवा यंत्र सामुग्री या कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा टप्पा |
|---|---|---|
| १ | दिनांक **२९/०८/२०११** पासून पोस्टाद्वारे प्राप्त होणारे अर्ज स्वीकारणे, अर्जाचे बंद लखोटे उघडून नमुन्याप्रमाणे संवर्गनिहाय यादी तयार करणे.<br>**दिनांक १५/०९/२०११** | **टप्पा क्रमांक ०१**<br>निविदा दर प्रति १००० नमूद करावा |
| २ | कार्यालयाने पुरविलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करुन लेखी परिक्षेकरीता पात्र/अपात्र अर्जदारांची त्यांचे आडनांव व पत्त्यानुसार संवर्ग निहाय यादी तयार करणे. तसेच प्रवर्ग/समांतर आरक्षणानुसार पात्र/अपात्र उमेदवारांची संवर्ग निहाय यादी करुन देणे.<br>**दिनांक ०५/१०/२०११** | |
| ३ | पात्र उमेदवारांची नमुन्याप्रमाणे प्रवेशपत्रे संवर्ग निहाय तयार करणे व निर्गमित तयार करणे.<br>**दिनांक १०/१०/२०११** | **टप्पा क्रमांक ०२**<br>निविदा दर प्रति १००० नमूद करावा. |
| ४ | परीक्षा केंद्रनिहाय हजेरीपट संवर्ग निहाय तयार करणे.<br>**दिनांक २५/१०/२०११** | |
| ५ | लेखी परीक्षेकरिता संवर्गनिहाय नमुना उत्तरपत्रिका (OMR) तयार करुन देणे, उत्तरपत्रिका नमुन्यात या कार्यालयाची मान्यता घेऊन उमेदवारांच्या संख्येनुसार उत्तरपत्रिकांची (OMR) छपाई करुन देणे. | **टप्पा क्रमांक ०३**<br>निविदा दर प्रति नग |
| ६ | उमेदवारांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांच्या संख्येनुसार (वापरलेल्या उत्तरपत्रिका) संगणकाद्वारे स्कॅनिंग व ऑटोमॅटीक पेपर तपासणी करुन उमेदवारांची प्रवर्गनिहाय (संवर्ग निहाय) प्राप्त गुणांची यादी तयार करुन देणे व गरजेनुसार प्रिंटआऊट काढून देणे, प्रवर्गनिहाय प्रथम अंतरिम निवड यादी व त्यानंतर अंतिम निवड यादी (संवर्गनिहाय) तयार करुन देणे व याचा सर्व डाटा डीव्हीडीवर कॉपी करुन देणे आणि अंतिम निवड व अतिरिक्त अंतिम निवड झालेल्या उमेदवारांचे अर्ज स्कॅन करुन त्यांची डीव्हीडी देणे. | **टप्पा क्रमांक ०४**<br>निविदा दर प्रति नग |

वरील सर्व कामांसाठी एकत्रित निविदा दाखल करणे आवश्यक आहे. एक अथवा दोन कामांसाठीच्या निविदेचा विचार केला जाणार नाही. निविदेमधील दर कामाच्या वरील टप्प्याप्रमाणे देण्यात यावेत. निविदा मंजूर करताना वरील ०४ टप्प्यांमध्ये नमूद केलेल्या दरानुसार निविदेची एकत्रित किंमत विचारात घेण्यात येईल.

कंत्राटदाराला एका वेळी किमान १००० उमेदवारांच्या परीक्षेचे काम केल्याचा अनुभव आणि एका वेळी किमान १००० उत्तरपत्रिका तपासण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. उपरोक्त स्वरुपाच्या कामाचा जास्त अनुभव असलेल्या कंत्राटदाराला प्राधान्य देण्यात येईल.

निविदा दोन लखोटा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. लखोटा क्रमांक १ (तांत्रिक तपशीलाचा लखोटा) मध्ये नोंदणी प्रमाणपत्र, आयकर/विक्रीकर प्रमाणपत्र सादर करणेची आहेत. लखोटा क्रमांक - २ (निविदेचा लखोटा) मध्ये दराची निविदा सादर करणेची आहे. लखोटा क्रमांक १ मध्ये निविदेमधील कामांचा अनुभव असल्याबाबतची कागदपत्रे व साधनसामुग्री असल्याबाबतची कागदपत्रे, तसेच नोंदणी प्रमाणपत्र, आयकर, विक्रीकर, पॅन, टॅन, व्हॅट बाबतची कागदपत्रे सादर करणेची आहेत. लखोटा क्रमांक १ उघडल्यानंतर लखोटा क्रमांक २ उघडण्यात येईल.

कोणतीही निविदा अगर निविदेतील कोणताही भाग, कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचा/राखून ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क जिल्हाधिकारी, रत्नागिरी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे. निविदेबाबतची आवश्यक ती माहिती जिल्हाधिकारी कार्यालय (आस्थापना शाखा), रत्नागिरी-४१५ ६१२ (दूरध्वनी क्रमांक ०२३५२-२२३५७३) येथे कार्यालयीन वेळेत मिळू शकेल.

**सही/- अजित पवार**
**प्रभारी जिल्हाधिकारी रत्नागिरी**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, रत्नागिरी**

क्रमांक आस्थापना -१/लि.ट./शि./स्व./अनुशेष/सीआर-१५/२०११
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक - २४/०८/२०११.